# प्रकरण दुसरे

# कळंबा मध्यवर्ती कारागृहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## प्रकरण २ रे

# कळंबा मध्यवर्ती कारागृहाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**प्रस्ताविक -**

शिक्षण व नैतिक शिक्षण, करमणुका, वाचनालये, सत्संग विविध प्रकारचे व्यावसायिक उपक्रम, आर्ट ऑफ लिव्हिंग कोर्स, प्रौढ साक्षरतेचे वर्ग, विविध विद्यापिठाच्या शैक्षणिक सुविधा या विविध उपक्रमाद्वारे कारागृहे हे बंदिजणांच्यात सुधारणा करून त्यांचे पुनर्वसन करत असतात. कारागृहे ही सुधारणागृहे आहेत. एखाद्या कृत्याची शिक्षा भोगत तुरुंगवासी जीवन जगणाऱ्या बंदिवानांची मन कायमची सुकलेली नसतात. संवेदन शीलतेचे झरे त्यांच्याही मनात असतातच. त्यांना पुरेशी वाट मिळाली तर त्यांचा प्रवास सुसंस्कृततेकडे सुरू होऊ शकतो, त्यांच्या जीवनातले कोरडेपण कमी हाऊ शकते व यासाठी समाजाने सुध्दा त्यांच्याकडे संकुचित दृष्टीकोन, पुर्वग्रहातून न पाहता पुन्हा त्यांना समाजात घेतले पाहिजे कारण कारागृहांमध्ये विविध गुन्ह्याखाली परिस्थितीमूळे हातून कळत न कळत घडलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगणाऱ्या या बंदिजणांमध्ये कारागृहे ही विविध उपक्रमातुन सुधारणा करत असतात. समाजाचे गुन्हेगारांपासून संरक्षण करून गुन्हेगारांच्यात परिवर्तन करणारी ही कारागृहे आपल्या समाज व्यवस्थेचे एक मुलभुत अंग असून संशोधनाच्या क्षेत्रात दुर्लक्षित राहिलेला हा घटक आहे.

प्रस्तुत अभ्यासाच्या अनुवंशाने आजवर दुर्लक्षित राहिलेल्या कळंबा कारागृहाचा एक अभ्यास विषय म्हणून विचार करीत असतांना 'कारागृह' ही संकल्पना कधीपासून अस्तित्वात आली असावी, कोल्हापूर परिसरात त्याच्या अस्तित्वाच्या नोंदी भुतकाळात किती मागे नेता येवू शकतात त्याचप्रमाणे आज कोल्हापूर मध्ये अस्तित्वात असलेल्या कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह कळंबाचा आजपर्यंतचा इतिहास पाहणे आवश्यक आहे.

**कोल्हापूरचे भौगोलिक स्थान -**

कोल्हापूर राज्य सन १७१० ला महाराणी ताराबाईनी स्थापन केले ते सन १९४९ पर्यंत टिकून होते. कोल्हापूर राज्याच्या सीमा खालील प्रमाणे होत्या.

उत्तर अक्षांश - १७° - १०' - ४५" व १५° - ५०' - २०"

पूर्व रेखांश - ७४° - ४४' - ११" व ७३° - ४३' - १६" [१]

कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्रीचा कडा व उत्तरेकडे वारणा नदी अशा नैसर्गिक सीमा असून पूर्वेकडे अंशः कृष्णा नदी व कर्नाटकातील बेळगाव जिल्हा तसेच दक्षिणेकडे बेळगाव जिल्हा अशा सीमा आहेत. पश्चिमेकडील सह्याद्रीच्या रांगेने सिंधुदुर्ग रत्नागिरी व कोल्हापूर जिल्ह्याची उत्तर सीमा आखलेली असून वारणा नदीने सांगली व कोल्हापूर जिल्ह्याची उत्तर सीमा आखली आहे. [२]

कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ ८०४७ चौ.कि.मी आहे. जिल्ह्याचा बहुतांश भाग उंचसखल, पूर्व भाग काहीसा विस्तृत खोऱ्यांचा आणि डोंगराळ असून पश्चिम घाटाच्या डोंगर रांगांनी व्यापलेला आहे. कोल्हापूर जिल्ह्याची समुद्र सपाटीपासून सरासरी उंची ५४८ मीटर आहे. [३]

या जिल्ह्यात शाहूवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, गगनबावडा, राधानगरी, करवीर, कागल, गडहिंग्लज, आजरा, भुदरगड व चंदगड असे १२ तालुके आहेत. [४]

विद्यमान कोल्हापूर जिल्हा करवीर संस्थानचे मुंबई राज्यात विलीणीकरण झाल्यानंतर सन १९४९ मध्ये अस्तित्वात आला. [५]

**कोल्हापूरचा इतिहास -**

इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात मौर्याची सत्ता कोल्हापूरवर असावी कारण कोल्हापूर येथील ब्रम्हपूरी उत्खननात त्याचे पुरावे मिळालेले आहेत. तसेच भारतीय इतिहासावरून

आणि अशोक मौर्यांच्या 'नालासोपारा' व 'मास्की' येथील शिलालेखावरून महाराष्ट्र भुभाग हा पूर्णपणे मौर्यांच्या प्रभावाखाली होता असे दिसते. मौर्यानंतर कोल्हापूरात सातवाहनांची राजवट सुरू झाली असावी कारण सातवाहन काळातील नाणी व पोहाळे पांडवदरा गगनबावडा येथे असणाऱ्या गुहावरून तसे संदर्भ मिळतात. यांच्याच काळात कोल्हापूर शहराचा व्यापार रोमन साम्राज्याशी चालत होता. कारण या काळात भारताकडून कापड व मिरी यासारख्या वस्तु रोमनला निर्यात केल्या जात असत. महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर भृकच्छ, कल्याण यासारखी बंदरे व नाला सोपारा, नाशिक, कऱ्हाड, जुन्नर आणि कोल्हापूर ही व्यापारी केंद्रे म्हणून उभारल्याची दिसतात.

कोल्हापूर मधील ब्रम्हपूरी येथे जे उत्खनन झाले, त्यामध्ये अनेक खापरे मिळाली यामधील काही खापरे रोमन बनावटीची आहेत. यावरून असे सिध्द झाले आहे की कोल्हापूर व रोमन साम्राज्यात व्यापार संबंध असावेत. सातवाहनानंतर चालुक्यांची व त्यांच्यानंतर राष्ट्रकुटाची सत्ता होती हे सामानगड, सांगली, कऱ्हाड येथे सापडणाऱ्या ताम्रपटावरून स्पष्ट होते. इ.स. ९७३ मध्ये चालुक्यांनी राष्ट्रकूटांचा पराभव केला विक्रमादित्याने इ.स. ११२३ मध्ये चंद्रिकादेवी बरोबर विवाह केला. लग्नानंतर विक्रमादित्याने खोची हे गाव ब्राम्हणाला दान दिले. त्याच दानपत्रात कोल्हापूर व अळत्याचा उल्लेख सापडतो. यावरून कोल्हापूर प्रांत चालुक्य साम्राज्याचा भाग होता हे स्पष्ट होते. यानंतर कोल्हापूर प्रांतावर शिलाहारांची राजवट होती. पुढे कोल्हापूरचा ताबा मुस्लिम राजवटीकडे गेला व शेवटी मराठ्यांचा अंमल कोल्हापूरवर राहिला होता.[६]

**कारागृहाची व्याख्या -**

"कोणत्याही देशात तेथील प्रचलित कायद्यानुसार व न्यायसंमत मार्गाने गुन्हा शाबित होऊन बंदिवासाची शिक्षा झालेल्यांना निर्दिष्ट काळापर्यंत ताब्यात घेणारी शासकीय संस्था म्हणजे कारागृह किंवा तुरूंग होय."[७]

**कारागृहासाठी प्रचलित असलेले शब्द -**

कारागृह या शब्दाव्यतिरिक्त कारागृहासाठी वेगवेगळे शब्द आपल्याला प्रचलित दिसुन येतात ते पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १. कारागार | २. तुरूंग | ३. बंदिशाळा |
| ४. बंदिखाना | ५. कैदखाना | ६. जेल |
| ७. जेलखाना | ८. कोंडवाडा | ९. कोठडी |
| १०. अंधारकोठडी | ११. काळेपाणी | १२. यमपुरी |
| १३. पिंजरा | १४. बंधन | १५. दगडी भिंत |
| १६. कच्ची कैद | १७. सुधारगृह | १८. गुन्हेगार वसाहत |
| १९. खुला तुरूंग [८] | | |

इत्यादीवरून कारागृहासाठी वेगवेगळे शब्द प्रचलित होते हे दिसून येते.

**कारागृह योजनेमागील दृष्टीकोन -**

फार वर्षापूर्वी कारागृहाची निर्मिती ही गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, त्यांना त्रास व्हावा, त्यांना सक्त मजुरी व्हावी, त्यांना जास्तीच्या शिक्षा व्हाव्यात अशी कारागृहात व्यवस्था करण्यात आली होती. अशा प्रकारची कारागृहाची व्यवस्था ही गावाच्या बाहेर, शहराबाहेर ठेवण्यात आली होती. या मागचे कारण आणि उद्देश असा होता की, समाजाला गुन्हेगारांपासून त्रास होणार नाही, इतर लोकांनी गुन्हेगारी वर्तन करू नये, गुन्हेगारांचा रोग फैलावू नये व इतरांना रूग्न बनवू नये, गुन्हेगारी वर्तन करू नये म्हणून कारागृहाची निर्मिती करण्यात आली होती. जेणे करून गुन्हेगार कारागृहात टाकल्यावर संपूर्णतः बंधनात येऊन गुन्हे करण्यास प्रतिबध्द होईल अशाच प्रकारची कल्पना होती.[९]

कारागृहाची कल्पना गुन्हेगारीविषयीच्या दृष्टीकोनात बदल झाल्याची द्योतक आहे. जशास तसे, खुनाचा बदला खुनाने, इत्यादिंच्या विचारसरणी मागे सुडाची भावना होती व शिक्षेच्या धाकाने इतर संभाव्य गुन्हेगारांवर वचक बसावा हा ही उद्देश होता. तसेच शासनाच्या आर्थिक गरजांनुसार काही ठिकाणी द्रव्यदंडास अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. कौटिल्य अर्थशास्त्रात दंड भरू न शकणाऱ्या गुन्हेगारांना बंधनागारात ठेवण्यात यावे असा आदेश आहे. द्रव्यदंड देऊ न शकणाऱ्यांकरिता व राजकीय कैद्यांकरिता कारागृहाची योजना करण्यात आली. गुन्हेगारांना समाजापासून अलग ठेवून समाजाचे रक्षण करावे आणि गुन्हेगारांना सुधारण्याची संधी द्यावी असेही दृष्टीकोन कारागृह योजनेमागे होते.[१०]

पूर्वी तुरुंगातील जीवन अतिशय भयप्रद असे ते सुधारण्याच्या दृष्टीने भारतात १८३६ पासून तुरूंग सुधारण्याच्या प्रयत्नांना सुरूवात झाली. आज कैद्यांना पूर्ण जरी नाही तरी बऱ्याच सुखसोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कैद्यांना माणुसकीच्या दृष्टीने वागवण्यात यावे ही विचारसरणी आज साधारणतः सर्व देशात दिसून येते. तुरूंगातील व्यवस्था व लोकांचा दृष्टीकोन पाहून कैद्यास वाटते की, आपणास समाजाचा शत्रु म्हणून वागविले जाते तो ही त्यामुळे शत्रु बनतो. हे वातावरण बदलण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. शिक्षणासाठी व व्यवसायर्जनासाठी सोय, नैतिक शिक्षण, करमणूका, वाचनालये, व योग्य वैद्यकीय तपासणी, मुदतीवर सुटका वगैरे अनेक बाबींनी तुरूंगाची सुधारणा होत आहे. १९३६ पासून तुरूंग सुधारणेकडे भारत सरकारही लक्ष देऊ लागले आहे.[११]

आधुनिक कारागृह नितित सुडाची व दहशत बसविण्याची भुमिका त्याज्य ठरली आहे. कारागृहात आलेला कैदी हा बाहेर पडताना योग्य रितीने समाजीकृत होऊन, समाजाशी समरस होऊन, जबाबदारीने, समाजमान्य मार्गाने, स्वतःचे सामाजिकस्थान मिळविण्यास पात्र ठरावा आणि त्या करिता कारागृहात असतांना त्यावर योग्य ते संस्कार करावेत असे आता मानले जाते. 'गुन्हेगार मानसिक रोगी आहे, विशिष्ट सामाजिक



BARR. B. K. ... KHARDEKAR
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

परिस्थितित रोग बळावला आहे, रोगाचे निर्मुलन करण्यासाठी कारागृह नावाच्या सुधारणा केंद्राची आवश्यकता आहे असे आज मानले जाते.[१२]

पुनर्वसनासाठी गुन्हेगारांची सुधारणा हे ध्येय ठेवून तुरूंग कायदा १८९४ नुसार महाराष्ट्रातील कारागृहांची स्थापना झाली आहे. अस्तित्त्वात असलेल्या कायद्याच्या विरूध्द वर्तन करून गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना समाजाच्या शांतता व स्वास्थतेच्या दृष्टीकोनातुन काही काळ एकांतवासात ठेवणे हा उद्देश कारागृहाची स्थापना करण्यामागे आहे. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी कारागृहामध्ये वैचारिक उपदेश, कायद्याचे मार्गदर्शन, शिक्षण, आरोग्याच्या दृष्टीकोनातून जीवन जगण्याची कला इत्यादींचा समावेश आहे. कैद्यांच्या शिक्षा कालावधीचा उपयोग त्यांच्या वर्तणुकीत आवश्यक त्या सुधारणा करून गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर ठेवणे या करिता केला जातो.[१३]

यावरून असे दिसून येते की, कारागृह या संकल्पनेत बदल होत जाऊन कारागृह ही फक्त गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी नसुन गुन्हेगारांपासून समाजाचे संरक्षण करणे व गुन्हेगारांच्यात सुधारणा करणे यासाठी आहेत. समाजव्यवस्थेचा मुलभूत अंग असणारी ही कारागृहे आज सुधारणागृहाचे रूप धारण करत असल्याचे आपणास दिसून येते.

**कारागृहाचा ग्रंथिक उल्लेख -**

कारागृहाचा ग्रंथिक उल्लेख भारतीय संस्कृतित महाभारतापासून आढळतो.

तयाहतप्रत्ययसर्ववृत्तिषु
द्वाःस्थेषु पौरेष्वनुशायितेष्वथ ।
द्वारस्तु सर्वाः विहिता दुरत्यया
बृहत्कपाटायसकीलशृङ्खःले ।।
ताः कृष्णवाहे वसुदेव आगते [१४]

याचा अर्थ मथुरेचा राजा उग्रसेन याचा मुलगा कंस हा जुलमी राजा होता. नारदमुनीकडून कंसाला भविष्यवाणीची सूचना मिळते की कंसाची बहिण देवकी हिच्यापोटी जन्माला येणारे ८ वे संतान कंसाच्या मृत्युला कराणीभुत ठरेल. त्यामुळे भितीपोटी कंसाने देवकी व तिचा पति वसुदेव यांना कारागृहात बंदी बनवून ठेवले. देवकीचे ८ ही संतति कारागृहात जन्माला आली. यापैकी ७ बालकांचा कंसाने दगडावर आपटून वध केला. परंतु देवकीच्या ८ व्या बालकाचा कृष्णाचा जन्म कारागृहात झाला. वसुदेवाने या बाळाला गोकुळात नंद राजाच्या घरी यशोदेपाशी नेऊन ठेवले व यशोदेच्या पोटीजन्माला आलेल्या कन्येला घेऊन तो परत कारागृहात आला.

भारतीय संस्कृतिमध्ये कृष्ण जन्माची ही कथा सर्वश्रुत आहे. भांडारकर इन्स्टिटट्यूटच्या 'हरिवंश' ग्रंथातील 'विष्णुपर्वात' पृष्ठ ३३१ या विष्णुपर्वात देवकीला बंदिवान बनवण्यासाठी खिळ्यांनी युक्त असे साखळदंडानी बांधून ठेवल्याचा उल्लेख पाहायला मिळतो.

**कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील कारागृहाची रचना -**

दुसरा ग्रंथिक उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रात पहायला मिळतो. कौटिल्य मौर्यकाळात राजकुलाचा अमात्य होता. राजाची कर्तव्ये आणि नगररचना याविषयी त्याचे विचार अधिकार सर्वमान्य होता. कौटिलीय अर्थशास्त्र हा ग्रंथ त्याचे उत्तम उदाहरण आहे. एखाद्या उत्तम नगराची रचना करीत असतांना राजप्रसाद (राजवाडा) सेनापती, मंत्री आदींची निवासस्थाने, बाजारपेठा, मंदिरे, शुद्रांची निवासस्थाने, धान्य साठवण्याचे कोठारी इत्यादी बाबींबरोबर अपराध्यांना शासन करण्यासाठी किंवा बंदिवासात ठेवण्यासाठी योग्य पध्दतीच्या कारावासाची रचना कशी असावी, याशिवाय कारागृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या निवासाची सोय, त्यांच्या कामाच्या जागेजवळ करणे भाग आहे. याचेही उल्लेख मिळतात. राज्यशासनाच्या प्रशासकीय विभागाबरोबर नागरी गुन्ह्यातील अपराधी

किंवा राष्ट्रद्रोही, शत्रुसैन्याचे सैनिक यांच्यासाठी वेगवेगळ्या कोठड्यांच्या कारागृहाची रचना करावी तसेच बंधनगारातील कैद्यांची नावे, त्यांनी केलेला गुन्हा, त्याला झालेला शिक्षेचा प्रकार व त्या शिक्षेची मुदत वगैरे माहितीची नोंद ठेवण्याच्या कामासाठी व नोंदवह्या ठेवण्यासाठी मोठमोठ्या दालनाची रचना करणे आवश्यक आहे इत्यादी बारकाईचा विचार त्याही काळात केला गेलेला आढळतो.

"बंधनागार म्हणजे तुरूंग हे दोन प्रकारचे असतात. न्यायाधीशांनी शिक्षा केलेल्यांसाठी आणि मोठ्या अधिकाऱ्यांनी शिक्षा केलेल्यांसाठी वेगवेगळी बंधनागारे बांधत असत. त्यात पुन्हा स्त्रिया व पुरूष यांच्यासाठी स्वतंत्र बंधनागार हवीत; म्हणजे एकाच कुंपनात परंतु चार निरनिराळ्या इमारतींना बंधनागार होते. या चार निरनिराळ्या इमारतींमध्ये पून्हा त्यांच्या रक्षकांच्या, तुरूंगाधिकाऱ्याच्या, कामकाजाच्या तसेच आयुधे ठेवण्यासाठी लागणाऱ्या खोल्या याही बांधावयास हव्यात. बंधनागारातील कैद्यांची नावे, त्यांनी केलेला गुन्हा, त्याला झालेला शिक्षेचा प्रकार, व त्या शिक्षेची मुदत वगैरे नाहितीची नोंद तेथे ठेवत असतील तेंव्हा या कामासाठी व नोंदवह्या ठेवण्यासाठी मोठमोठी दालने बांधने आवश्यक होत असावे याशिवाय कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या निवासाची सोय त्यांच्या कामाच्या जागेजवळ करणे भाग आहे.

या सर्व आगारात गटारे व पिण्याचे पाणी, शौचकूप, स्नानगृह असून अग्नी व विष यापासून रक्षणाची व्यवस्था केलेली असावी मांजर व मुंगूस यांनादेखील रक्षणासाठी तेथे पाळावे. याशिवाय त्या-त्या कोष्ठागारात काम करणाऱ्या व बंधनागारात असलेल्या लोकांच्या पुजेच्या गरजेसाठी त्या त्या आगारात त्या त्या विशिष्ठ देवतांची पुजेची व्यवस्था असलेल्या खोल्या असाव्यात. या देवता कोशगृहाची देवता कुबेर, पण्यगृहाची श्री, कोष्ठागाराची सिता, कृप्यगृहाची ईशान, आयुधागाराची स्कंद व बंधनागाराच्या देवता यम व वरूण आहेत.

कोशगृह इतर प्रकारची कोष्ठगृहे, शस्त्रागार तसेच बंधनागार यावर काम .करणारे कर्मचारी व अधिकारी यांच्यावर फार मोठी जबाबदारी असते. किंबहुना देशाचे आयुधामुळे

निर्माण होणारे सामर्थ्य व समृध्दीमुळे निर्माण होणारे सामर्थ्य ही दोन्ही एकवटली आहेत. तेंव्हा त्यांच्या मन व बुध्दीवर योग्य तो अंकुश असावा म्हणूनही देवालयाची योजना येथे केलेली असावी बहुधा, कौटिल्याने याच जाणिवेतुन संनिधान्याने 'विश्वासू माणसे' हाताखाली घेऊन हे सर्व साठे करावेत अशी स्पष्ट सुचना दिली आहे.[१५]

प्रस्तुत 'कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र या र. पु. कुलकर्णी यांच्या या ग्रंथातील विवेचनावरून कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात फक्त कारागृहाचा उल्लेखच आला नाहीतर संपूर्ण कारागृहाची रचना कशी असावी याची माहिती दिलेली दिसते. तसेच कारागृहात कैद्यांना कोणत्या सोयी असाव्यात, वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी केलेल्या शिक्षेसाठी वेगवेगळी बंधनागारे असावीत. स्त्रि व पुरूष यांना स्वतंत्र बंधनागार असावीत. तसेच कारागृहातील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या निवासाची सोय कामाच्या सुरळीतपणाच्या, व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कारागृहाच्या कुंपणाच्या आतच असावी इत्यादींचा उल्लेख 'अर्थशास्त्र' ग्रंथात कौटिल्याने केलेला आढळतो. व त्याप्रमाणे बहुतांशी आज कारागृहाची रचना आपल्याला पाहायला मिळते. त्यामध्ये

१. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सांगितल्याप्रमाणे स्त्रि व पुरूष यांना स्वतंत्र बंधनागार हवीत त्याचप्रमाणे आजही तुरुंगव्यवस्थेत स्त्री व पुरूष यांच्यासाठी स्वतंत्र बंधनागार स्वतंत्र व्यवस्था तुरूंगात दिसते. म्हणजेच एकाच तुरुंगात स्त्री व पुरूष यांना स्वतंत्र कोठडीत ठेवण्याची व्यवस्था कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सांगितल्याप्रमाणे पहायला मिळते.

२. तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रात कारागृहाच्या कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांच्या निवासाची सोय ही कामाच्या जागेजवळ करणे भाग आहे असा उल्लेख आहे. त्याप्रमाणे आजच्या कारागृह व्यवस्थेतही कामाच्या सुरळीतपणाच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन कर्मचारी व अधिकाऱ्यांची सोय कारागृहाच्या कुंपणाच्या आतच केलेली दिसून येते.

३. कौटिल्याने कारागृहाच्या इमारतीत पिण्याचे पाणी, शौचकूप, स्नानगृहाची सोय असावी असे सांगितले आहे. तशीच सोय आजच्या तुरुंगव्यवस्थेतही पाहायला मिळते.

**कारागृह यंत्रणा उत्पत्ती -**

स्वातंत्र्यापूर्वी भारतात अस्तित्वात असलेले कारागृह प्रशासन हे इंग्रजी न्याय पध्दतीचे एक उपांग होत. [१६] भारतातील कारागृह पध्दती ब्रिटिश न्याय पध्दतीच्या अनुषंगाने निर्माण झालेली होती. व तिचे प्रमुख कार्य हे फक्त गुन्हेगारांना आपल्या ताब्यात ठेवणे एवढेच मर्यादित होते. हळू हळू कारावास हीच मुळ शिक्षा समजली जाऊ लागली आणि तिचे कार्य हे फक्त 'अभिरक्षात्मक' न राहता 'शिक्षात्मक' बनले. [१७]

भारतातील कारागृहांची व्यवस्था राज्य शासनाच्या कक्षेतील असून ती १९८४ च्या प्रिझन्स ॲक्ट या कायद्यान्वये झाली आहे. त्यानंतरच्या रिफॉर्मेटरी स्कूल ॲक्ट १८९७, प्रिझन्स ॲक्ट १९००, आयडेंटी फिकेशन व प्रिझन्स ॲक्ट १९२०, एक्सचेंज ऑफ प्रिझन्स ॲक्ट १९४८, ट्रान्सफर ऑफ प्रिझन्स ॲक्ट १९५० आणि प्रिझन्स ॲक्ट १९५५ या कायद्यान्वये वेगवगळ्या तरतुदी करण्यात आल्या. [१८]

१९४८ मध्ये मुंबई तुरुंग सुधारणा समितीचा जो अहवाल प्रसिध्द झाला होता त्यात कारागृहे तसेच त्यात ठेवलेल्या कैद्यांच्या स्थितित आणखी सुधारणा करण्याविषयीच्या कित्येक शिफारशी करण्यात आल्या होत्या. शासनाने त्यापैकी पुष्कळशा शिफारशी स्विकारल्या होत्या. या तुरुंग सुधारणा 'महात्मा गांधी' यांच्या खालील कल्पनेवर आधारित होत्या.

"गुन्हा हा दुसरे तिसरे काही नसुन रोगी मनाचे लक्षण आहे. आणि प्रथम कैद्यांच्या रोगी मनावर संस्कार करणे आणि त्याला सोडून दिल्यावर समाजामध्ये जाऊन एक प्रामाणिक जीवन जगण्यास त्यास समर्थ करणे हे कारावासाचे उद्दिष्ट असले पाहिजे."

१९४६ च्या मुंबई तुरुंग सुधारणा समितीने केलेल्या तुरुंग सुधारणा विषयीच्या शिफारशी या अशाप्रकारे तुरुंगातून कैदी सोडण्यात आल्यानंतर त्याने सभ्य नागरिकासारखे समाजात वावरावे अशा प्रकारे कैद्यांच्या मनात जीवन जगण्याची आशा निर्माण करण्यास सर्वतोपरी मदत करणे या ध्येयावर आधारित होत्या. [१९]

१९६० साली केंद्रीय सुधार सेवा खात्याने आदर्श कारागृहाची नियम पुस्तिका मंजूर केली ही पुस्तिका १९५७ साली नेमलेल्या अखिल भारतीय कारागृह समितीने तयार केली होती. तिच्याच आधारे महाराष्ट्र शासनाने कैद्यांना द्यावयाच्या वागणुकीबाबत नियम तयार करून ते कारागृहांना लागू केले आहेत. [२०]

म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील कारागृहपध्दती ही ब्रिटीश न्यायपध्दतीच्या अनुषंगाने निर्माण झालेली होती. तसेच ब्रिटीशांचा अंमल सुरू होण्याअगोदर भारतात न्यायव्यवस्थेत एकवाक्यता नव्हती. एकाच प्रकारच्या गुन्ह्याकरिता वेगवेगळ्या शिक्षा दिल्या जात. परंतु ब्रिटिशांची शासनव्यवस्था सुरू झाल्यापासून न्यायदान व्यवस्थेत व शिक्षा देण्याच्या पध्दतीमध्ये सुसूत्रता आली. अधिक काटेकोरपणे गुन्हे व गुन्हेगारांची चौकशी केली जाऊ लागली. कोल्हापूर राज्यातही सन १८४४ पासून न्यायपध्दती ब्रिटिशांच्या धर्तीवर सुधारण्यात आली. [२१]

## गुन्हेगार जाती -

विशेषतः समाजातील मांग, बेरड, रामोशी ह्या जातीचे लोक चोऱ्या करीत असत. या लोकांचा बंदोबस्त करण्याविषयीचा उल्लेख १८१८ च्या एका पत्रात आढळतो. त्यावरुन मांग, बेरड, रामोशी ह्या जातीचे लोक चोऱ्या करीत असावेत असे दिसून येते.[२२]

कोल्हापूर राज्यामध्ये कैकाडी, महार, मांग, बेरड, गारूडी, पारधी, कोल्हाटी, भामटे आणि वड्डर या मुख्य गुन्हे करणाऱ्या जाती होत्या. हे टोपल्या विणत असत, गुरांचा व्यापार करीत असत काही वेळा भिक्षाही मागत, कैकाडी व कोल्हाटी हे दरोडेखोर म्हणून

कोल्हापूर राज्यात प्रसिध्द होते. भामटे लोक उचलेगिरी करीत असत. वड्डर लोक घरे फोडीत असत. तर महार मांग जातीचे लोक घरे करून राहू लागले होते. या जातीच्या लोकांना दररोज हजेरी द्यावी लागत असे. पोलिस पाटलाच्या परवानगीशिवाय त्यांना गाव सोडता येत नसे. इतर गुन्हे करणाऱ्या जाती परप्रांतातून या राज्यात आल्यावर पोलिस पाटलाच्या परवानगी शिवाय त्यांना गाव सोडता येत नसे. पोलिस त्यांच्यावर लक्ष ठेवून असत. कारण त्यांच्यापासून इतर लोकांना कसलाही त्रास होवू नये हाच त्यापाठीमागे त्यांचा हेतू असे. [२३]

यावरून असे दिसून येते की, पूर्वी ठराविक जाती या गुन्हेगार जाती म्हणून ओळखल्या जात होत्या. पण आज यामध्ये बदल झाल्याचे दिसून येते. आज ठराविक जाती गुन्हेगार म्हणून ओळखल्या जात नाहीत आज गुन्हा करणारा गुन्हेगार हा कोणत्याही जातीतील असू शकतो.

**शिक्षेचे स्वरूप -**

गुन्हेगारांना शिक्षा देतांना त्या काळच्या चालिरिती, रूढी, परंपरा लक्षात घेवून न्याय दिला जात असे. अपराधी किंवा संशयित आरोपीकडून दिव्य ही करून घेतले जात होते. त्यामध्ये

१. उकळत्या तेलातून लोखंडाचा तुकडा हाताने काढणे,
२. गंगाजल हातात घेऊन शपथ घेणे,
३. मंदिराच्या पायऱ्यांवर हात मारणे,
४. स्वत:च्या प्रिय माणसांची शपथ घेणे,

असे दिव्य त्याला करावी लागत होती. तसेच नीच जातीच्या गुन्हेगाराने केलेला गुन्हा कबुल करावा म्हणून त्यास.

१. मिरच्यांची धुरी देणे
२. टिपऱ्या लावणे,

३. उरावर दगड ठेवणे

इत्यादी शिक्षा दिल्या जात असत. धिंड काढण्याचीही शिक्षा दिली जात होती. ही शिक्षा सर्वात बेअब्रुची व कडक अशी समजली जात होती. यामध्ये गुन्हेगारांचे तोंड काळे करून त्याला गाढवावर शेपटीकडे तोंड करून बसविले जात होते. तसेच त्याला गाढवावर बसवून, ढोलकेवाजवून त्याला गावातून फिरवले जात होते. धिंड काढल्यानंतर त्या माणसाला गावातुन हद्दपार केले जात होते. [२४]

याशिवाय फाशी देणे, डोके उडवणे, कडेलोट करणे, हत्तीच्या पायी देणे, सुळावर चढविणे इत्यादी शिक्षा प्रचारात आल्या. [२५]

डॉ. दमयंती दुंगाजी या 'Crime & punishment in ancient Hindu Society' या पुस्तकामध्ये प्राचीन कालीन शिक्षा व आधुनिक कालीन शिक्षा यात फरक स्पष्ट करतांना लिहितात, "प्राचीन काळी सौम्य गुन्ह्यास सुध्दा बऱ्याचवेळा मृत्युदंडाची शिक्षा दिली जात असे तर आधुनिक काळात काही विरळ प्रकरणात मृत्युदंड दिला जातो. देहदंडाचे प्रायश्चित देताना भिंतीत चिरडणे, हत्तीच्या पायदळी देणे, उंचावरून कडेलोट करणे तसेच शिक्षेची अंमलबजावणी करतांना भयंकर यातना आरोपीस होतील अशी व्यवस्था होती. ज्यायोगे इतर लोकांनी गुन्हा करू नये, गुन्हेगारीस प्रवृत्त होऊ नये. या शिक्षा सार्वजनिक ठिकाणी दिल्या जात होत्या. तसेच सर्वात महत्वाची बाब म्हणजे प्राचीन शिक्षा या पक्षपातीपणे दिल्या जात ब्राम्हणजातीस मृत्युदंड, हातपाय तोडणे अशा क्रुर शिक्षा दिल्या जात नसत. परंतु आधुनिक काळात सर्वांना मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा किंवा स्त्री पुरूष असो आणि त्यांनी गुन्हा केला तर शिक्षा समान आहेत.[२६]

तसेच एकाच प्रकारच्या गुन्ह्याकरिता वेगवेगळ्या शिक्षा दिल्या जात. ब्रिटिशांचा अंमल सुरू होण्याअगोदर भारतात न्यायव्यवस्थेत एकवाक्यता नव्हती. परंतु ब्रिटिशांची शासनव्यवस्था सुरू झाल्यापासून शिक्षा देण्याच्या पध्दतीमध्ये सुसुत्रता आली. [२७]

यावरून असे दिसून येते की, पूर्वीच्या शिक्षेचे स्वरूप पाहिलेतर दिव्य करण्याची पध्दती होती, शिक्षा देतांना पक्षपातीपणे दिल्या जात. एकाच गुन्ह्यासाठी गुन्हेगारांना वेगवेगळ्या शिक्षा दिल्या जात होत्या. म्हणजेच न्यायव्यवस्थेत एकवाक्यता दिसून येत नाही. पण १८४४ पासून ब्रिटिशांच्या धर्तीवर न्यायपध्दती सुरू झाल्यामुळे न्यायदानात एकवाक्यता आलेली दिसून येते. थोडक्यात गुन्हेगार जाती, दिव्य करण्याची पध्दत एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या शिक्षा यामध्ये आज बदल झालेला दिसून येतो. तसेच पुर्वी ज्याप्रमाणे कोल्हापूरात गुन्हेगारांना किल्यात, अंधारकोठडीत ठेवण्याची व्यवस्था होती. तसेच चावडीत बांधून ठेवणेची व्यवस्था होती. पण १८४८ ला कोल्हापूरमध्ये थोरला तुरूंग बांधला गेला व गुन्हेगारांना तुरुंगात ठेवण्यात येऊ लागले. याचाच अर्थ शिक्षेचे स्वरूप, अपराध्यांना बंदिस्त करण्याचे ठिकाण यामध्ये बदल होत जाऊन गुन्हेगारांसाठी त्यांच्या गुन्ह्याच्या स्वरूपानुसार वेगवेगळ्या तुरूंगात ठेवण्याची व्यवस्था आपल्याला केलेली दिसून येते.

**कारागृहाचे वर्गीकरण -**

महाराष्ट्र कारागृह विभागात ९ मध्यवर्ती कारागृहे, २७ जिल्हा कारागृहे, १० खुली कारागृहे, १ खुली वसाहत आणि १७२ उपकारागृहांचा समावेश होतो.

पुणे आणि मुंबई मध्ये महिलांसाठी स्वतंत्र कारागृह आहे. पुण्यात महिलांसाठी स्वतंत्र कारागृह आहे. महाराष्ट्र कारागृह विभागाचे मुख्यालय पूण्यात असून राज्य प्रशिक्षण केंद्र पुण्यात येरवडा येथे आहे. कारागृह विभाग महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागासोबत काम करतो. [२८]

महाराष्ट्र राज्यामध्ये कारागृहाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.

१. मध्यवर्ती कारागृहे
२. जिल्हा कारागृहे
३. विशेष कारागृहे

४. खुली कारागृहे

५. बृहमुंबईतील दिवाणी कारागृह

कारागृहाच्या कामकाजाच्या प्रयोजनासाठी राज्याचे १) पश्चिम विभाग, २) मध्य विभाग ३) पूर्व विभाग असे विभाग करण्यात आले आहेत. त्यामध्ये

१) पश्चिम विभाग - पश्चिम विभाग हा मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्हा आणि ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली आणि कोल्हापूर हे जिल्हे मिळून बनलेला आहे.

२) मध्य विभाग - मध्य विभाग हा औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद, नाशिक, अहमदनगर आणि सोलापूर हे जिल्हे मिळून बनलेला आहे.

३) पूर्व विभाग - पूर्व विभाग हा अकोला, भंडारा, बुलढाणा, जळगाव, धुळे हे जिल्हे मिळून बनलेला आहे. [२९]

यामध्ये कोल्हापूर येथील 'कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा' हे मध्यवर्ती कारागृहामध्ये मोडते. १९४८ साली कळंबा येथे हे कारागृह बांधण्यात आले. [३०]

सुरूवातीला हे कारागृह जिल्हा कारागृह होते. सन ०१/१०/१९९० पासून कोल्हापूर जिल्हा कारागृहाचे, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहात रूपांतर झाले. [३१]

याशिवाय कोल्हापूर मध्ये कळंबा कारागृहाच्या निर्मिती अगोदर १८४७-४८ मध्ये १२,००० रूपये खर्च करून आदितवारच्या वेशीजवळ बांधलेले हे पहिले 'कोल्हापूर शहर कारागृह' जिल्हा कारागृह वर्ग तीनमध्ये मोडते. [३२]

**कोल्हापूर मधील तुरुंग व्यवस्थेचा इतिहास -**

१) **किल्ले (पन्हाळा) -** कोल्हापूर येथे पहिले कारागृह १८४७-४८ मध्ये बांधले गेले. त्या अगोदर गुन्हेगारांना किल्ल्यात कोंडून ठेवीत. यासंबंधी विसापूर, रायगड,

लिंगाणा, पन्हाळा इ. किल्ल्यांच्या इतिहासात उल्लेख मिळतात. काही वेळेला गुन्हेगाराला चावडीत बांधून ठेवीत.[33] यावरून किल्ले बांधतानाच किल्ल्यावरती गुन्हेगाराची ठेवण्याची व्यवस्था होईल अशी रचना केलेली दिसते.

२) **रंकोबाच्या मंदिराजवळील अंधारकोठड्या व तळघरे** - ज्याप्रमाणे हल्ली तुरुंग आहेत, त्याप्रमाणे पूर्वी नव्हते. जो अपराधी आहे त्यास किल्ल्यावर कोंडून ठेवीत. खुद्द कोल्हापूरात अशी परिस्थिती होती की, शहराच्या मध्यभागी रंकोबाच्या देऊळाजवळ काही अंधारकोठड्या व तळघरे होती. त्यात टाकीत असत. [३४]

यावरून असे दिसून येते की, कोल्हापूर परिसरात सध्या अस्तित्वात असलेले किल्ले, तसेच अवशेष रूपात अस्तित्वात असलेल्या काही इमारती यांचे निरिक्षण केले तर 'कारागृह' या संकल्पनेचा सांगोपांग विचार करून या इमारतींची रचना झाली असावी असे दिसून येते.

३) **थोरला तुरुंग/ कोल्हापूर जिल्हा कारागृह** - गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी कोल्हापूर येथे सर्वात मोठा तुरुंग होता. या तुरुंगाशिवाय १३ छोटे तुरुंग होते. या छोट्या तुरुंगात ज्यांचा इनसाफ होणे आहे असे गुन्हेगार आणि ज्यांना अल्प शिक्षा होतात असे कैदी ठेवले जाई. हे छोटे तुरुंग करवीर, पन्हाळा, अळते, शिरोळ, भुदरगड, गडहिंग्लज, रायबाग, कटकोळ, विशाळगड, बावडा, इचलकरंजी, आजरे आणि कागल या ठिकाणी होते. कोल्हापूर येथील थोरला तुरूंग सन १८४७-४८ साली १२००० रूपये खर्चून हा तुरुंग अदितवारच्या वेशीजवळ बांधला. १९७३ साली आणखी १२,००० रूपये खर्चून मुख्य इमारतीच्या उत्तरेची बाजू दुमजली करण्यात आली. मुख्य इमारती शिवाय दुसऱ्या छोट्या इमारती होत्या त्यापैकी एकात इनसाफ होणाऱ्या कैद्यांना ठेवत व दुसरीत महिला कैद्यांना ठेवत.

मुख्य इमारत चौकाची असून सभोवताली ३० फूट उंचीची दगडी भिंत होती. आणि उत्तरेच्या अंगास २ भक्कम दरवाजे होते. आतील दवाजा लोखंडी गजाचा तर बाहेरील दरवाजा लोखंडी पत्र्याने आच्छादलेल्या लाकडी फळ्यांचा होता. उत्तरेकडच्या भागास मात्र दुमजला होता. एकंदर पंधरा कोठड्या होत्या व प्रत्येक कोठडीस तीन बाजूंनी लोखंडी गजांच रेलिंग होते. मुख्य इमारतीच्या दक्षिणेस तटाच्या एका बुरूजावर कैद्यांस कोंडण्याच्या आठ फूठ चौरस अशा दोन अंधारकोठड्या होत्या. अंधारकोठड्या पुढील बाजू ही पहाऱ्यावरील शिपायांसाठी ठेवली होती. ज्यांचा इन्साफ होणे बाकी आहे. अशांसाठी १४ कोठड्या होत्या. त्यापैकी १० स लाकडी गजांचे रेलिंग आणि चोहोस लोखंडी गजाचे रेलिंग होते. आणि लाकडी फळ्यांचे छत्र होते. प्रत्येक कोठडीत एकच कैदी ठेवला जाई. या इमारतीत शिरण्याचा दरवाजा हा पश्चिमाभिमुख होता. त्याच्या शेजारीच कैदी स्त्रियास ठैवण्याची इमारत होती. यापैकी काही भागात लाकडी गज होते व बाकी भाग हा उघडा असून त्या ठिकाणी कैदी जेवण करीत असत. याचा दरवाजा पश्चिमाभिमुख होता.

या तुरुंगासाठी स्वतंत्र असा दवाखाना होता. या दवाखान्याची इमारत ६४ फुट लांब व ४० फुट रुंद होती. यात ६ आजारी कैद्यांना राहण्याजोग्या २ खोल्या होत्या. सन १८८१ ते ८२ सालच्या पूर्वीच्या १० वर्षात दरसाल २३३.६ कैदी आजारी होते व ७.८ मेले तटाच्या पश्चिम चौकात देहांत शिक्षा झालेल्या कैद्यांना फाशी दिली जाई.

सन १८८३ मध्ये कोल्हापूर इनफंट्रीच २५ शिपाई व एक सुभेदार असे रोज तुरुंगाच्या पहाऱ्यावर असत. याशिवाय काही पोलिस शिपाई असत. तसेच जेलर, नाईक, हवालदार, जमादार वगैरे तुरूंगावर १६ कामगार होते.

तटाबाहेर मुख्य इमारतीपासून ६०० फूट अंतरावर तुरुंगाचा कारखाना होता. या कारखान्यात सुती कापड व जमखाने तयार केले जात. आणि सुतारकाम व वेताचे काम ही केले जाई. ज्या कैद्यास जास्त सजा झाली आहे अशा कैद्यास त्या ठिकाणी काम करण्यास ठेवत. आणि इतर कैद्यांना रोज दोन आणे देऊन कामावर पाठवत. स्त्री कैद्यांना स्वयंपाक

करण्यास व धान्य दळण्यास पाठविले जाई आदितवार शिवाय सकाळी ६ पासून ११ पर्यंत व दुपारी १ पासून ५ पर्यंत कैद्यांकडून काम करून घेत. सन १८८३-८४ साली तुरुंग कारखाण्यापासून ६७७ रूपये किफायत झाली होती. त्याच साली एकंदर ५०५ कैद्यांपैकी ४०० पुरूष व १०५ स्त्रीया होत्या. आणि त्यात ४७८ हिंदु, २६ मुस्लीम व १ खिरस्ती असे होते.

ज्या कैद्यांना शिकण्याची इच्छा असेल त्यांच्यासाठी तुरूंगात एक रात्रशाळा होती या शाळेत लिहणे, वाचणे, व थोडे अंकगणित शिकविले जाई. सन १८८३-८४ साली प्रत्येक कैद्यानिमित्त निव्वळ खर्च ७१ रूपये आला. कोल्हापूर येथे दरबार सर्जन कोल्हापूरच्या मोठ्या तुरुंगाचे सुपरिटेंडेन्ट होते. [३५]

कोल्हापूर येथील थोरला तुरूंगातील प्रत्येक कैद्यास दररोज जो खाना दिला जाई तशाच प्रकारचा खाना पेट्याच्या व इतर लहान तुरुंगातील कैद्यांनाही द्यावा असा ठराव सन १८९२ मध्ये झाला होता. कैद्यांच्या हजामतीचा खर्च जी कायम रक्कम तालुकानिहाय दिली होती. यातून खर्च करण्याची तरतुद १९ डिसेंबर १८९० रोजी करण्यात आली होती. [३६]

अशा प्रकारे १८४७-४८ मध्ये निर्माण झालेल्या या कोल्हापूरातील पहिल्या कारागृहाचा विकास व व्यवस्थापन पहायला मिळते. आज हेच पहिले कारागृह 'कोल्हापूर शहर कारागृह' म्हणूनही ओळखले जाते. ज्याला पूर्वी थोरला तुरूंग म्हणून ओळखले जात होते.

कोल्हापूरातील हे पहिले कारागृह 'कोल्हापूर शहर कारागृह वर्ग तीन' या नावाने ओळखले जाते. त्यात कच्ची कैद झालेले कैदी ठेवले जातात. या कैद्यांना शिक्षा झाल्यानंतर त्यांच्या शिक्षेनुरूप त्यांना वेगवेगळया ठिकाणच्या तुरुंगात पाठविले जाते. [३७]

याचा अर्थ आज या कारागृहात फक्त कच्ची कैद झालेले कैदी ठेवले जातात. शिवाय कोल्हापूरात सोनतळी कॅम्प नावाचे दुय्यम कारागृह १९४२ मध्ये स्थापन केले परंतु ते १९५२ साली बंद करण्यात आले. [३८]

**कळंबा कारागृहाची निर्मिती -**

**१. कारागृह रचनेचा आराखडा - (कळंबा)**

एक सुनियोजित नगर म्हणून कोल्हापूरच्या नगर रचनेचा आढावा जेंव्हा घेतला गेला त्यावेळी असे लक्षात आले की संस्थानचे तुरुंग खाते १९४६ मध्ये एका तुरुंगाधिकाऱ्यांच्या नेतृत्त्वाखाली असून हा मध्यवर्ती तुरुंग शहराच्या एका पुरातन किल्ल्याच्या भागात होता. व ही जागा व इमारत जरी आजवरती मध्यवर्ती तुरुंग म्हणून उपयोगी पडली असली तरी आधुनिक प्रमाणांच्या दृष्टीने विचार केल्यास ती सर्वस्वी असमाधानकारक झाली होती. बंदिवानांना शैक्षणिक व दुसऱ्या सवलती उपलब्ध करून देण्यासाठी व आधुनिक अशी कारागृह व्यवस्था अंमलात आणण्याच्या दृष्टीने तुरुंगाची जागा व इमारत हे दोन्हीही लहान असल्याने अपूरी पडत होती. तसेच या आराखड्यानुसार इतर योजना सुध्दा आखल्या होत्या. त्यामध्ये -

१) बोस्टन शाळा सुरू करणे
२) तुरुंगातील उद्योगधंदयाची वाढ व सुधारणा करणे
३) तुरुंग कारभार आधुनिक करणे

असा आराखडा होता. व या सर्व योजना तुरुंगाची नवी इमारत बांधली जाईपर्यंत स्थगित ठेवल्या होत्या. व या योजनांचा आर्थिक तपशिलही तयार केले नव्हते.

यासाठी कोल्हापूर - गारगोटी रस्त्यावर एक विस्तृत जागा निवडून कोल्हापूर आणि दक्षिणी संस्थाने यांच्या दृष्टीने पुरेशा अशा भरपूर मोठ्या व आधुनिक अशा तुरुंगाची आखणी व योजना करण्यात आली व त्याकरिता १६००००० रूपये अंदाजे खर्च धरण्यात आला होता. तूर्त कोल्हापूरच्या गरजा भागवण्याच्या दृष्टीने तुरुंगाचा एक-एक भाग बांधण्याचे मंत्रिमंडळाने ठरवून त्याकरिता १२,८००० रूपये इतकी रक्कम मंजूर केली होती. व १९४६ मध्ये नव्या तुरुंगाच्या इमारतीच्या कामास सुरुवात झाली. व हे काम सुमारे एक-

दीड वर्ष पूर्ण करण्याचा आराखडा होता. [३९] व या आराखड्यानुसार आपला आभ्यास विषय असणाऱ्या कळंबा मध्यवर्ती कारागृहाच्या रचनेचा प्रारंभ झाला.

## निर्मिती -

कोल्हापूरमधील १८४७-४८ मध्ये बांधलेल्या पहिल्या कारागृहाची इमारत ही कैद्यांना अपूरी पडू लागली म्हणून सन १९४८ साली कळंबा येथे एक कारागृह बांधण्यात आले. व या कारागृहात एक ते तीन वर्षापर्यंत शिक्षा झालेले कैदी ठेवले जातात. कळंबा येथे नव्याने बांधलेले कारागृह सुरूवातीला कारागृह वर्ग तीन मध्ये मोडत होते. [४०]

## किशोर सुधारालयाची सुरूवात -

महाराष्ट्र राज्य स्थापने अगोदर धारवाड येथे किशोर सुधारालय ही संस्था अस्तित्वात होती. सन १९५० पासून सदरहून ही संस्था कोल्हापूर येथे आणणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. त्याप्रमाणे सन १९६२ पासून जिल्हा कारागृह, कळंबा या संस्थेला लागूनच 'किशोर सुधारालय सुरू करण्यात आले.

## मध्यवर्तीचा दर्जा -

जिल्हा कारागृह कळंबा ही सदर संस्था मध्यवर्ती कारागृहामध्ये स्थापित करणेबाबतचा प्रस्ताव शासनापुढे आल्याने सन १९७९-८० मध्ये सदर प्रस्ताव मंजूर झाला. ही संस्था कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह म्हणून प्रस्थापित झाली. प्रस्तावाप्रमाणे भव्य प्रशासकीय इमारत, कारागृहातील प्रत्येक विभागाच्या इमारती, कारागृहासभोवतालची उंच तटभिंत तसेच कारखाना विभागाचे वर्कशेड इत्यादी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधून घेण्यात आले.

सन ०१/०४/१९९० रोजी किशोर सुधारालय नाशिक येथे स्थलांतर झाल्यानंतर दिनांक ०१/१०/१९९० पासून कोल्हापूर जिल्हा कारागृहाचे कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहात

रूपांतर झाले. दि.०१/१०/१९९० पासून सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर व रत्नागिरी जिल्ह्यातील कारागृहाकडे क्षमतेपेक्षा जास्त बंदिस्त असलेले बंदी या कारागृहाकडे वर्ग करण्यात आले आहेत. तसेच इतर कारागृहाकडे बंदी ठेवण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त असलेले सिध्ददोष बंदी तसेच मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण या परिसरातील सिध्ददोष बंदी, वेगवेगळ्या गॅंगशी संलग्न असलेले बंदी या कारागृहात ठेवण्यात आलेले आहेत.

या कारागृहाचे एकूण क्षेत्रफळ ५१ हेक्टर ३५ आर इतके असून ८ मंडल विभागामध्ये एकूण बॅरकची संख्या ३२ असून विभक्त कोठडीची संख्या ८५ इतकी आहे. या कारागृहात अतिसुरक्षा विभाग स्वतंत्र असून यामध्ये ११ विभक्त खोल्या आहेत. तसेच आजारी बंद्यांना तत्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यासाठी दवाखाना विभाग वेगळा आहे. दिनांक १४/०६/२००८ पासून या कारागृहात महिला विभाग वेगळा सुरू करण्यात आलेला असून सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यातील महिला बंद्यांना ठेवण्यात येते. या कारागृहाची बंदी क्षमता पुरूष बंदी क्षमता १७५५ तर महिला बंदी संख्या ३४ एवढी आहे. या कारागृहास ६.२० हेक्टर आर बागायती जमिनी असून १८ हेक्टर आर जिरायती जमिन उपलब्ध आहे. बंद्यांच्या सामाजिक, शैक्षणिक हित लक्षात घेऊन व त्यांचे सुधारणा पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने कारागृहाच्या आतील मध्यवर्ती ठिकाणी सुसज्ज ग्रंथालय असून त्यामध्ये बंद्यांना वाचनासाठी विविध धार्मिक ग्रंथ, मनोरंजक पुस्तके, शैक्षणिक साहित्य ठेवण्यात आलेले आहेत. कारागृहातील बंद्यांसाठी त्यांना लागणाऱ्या दैनंदिन जिवन उपयोगी वस्तुची खरेदी करण्यासाठी उपहारगृहाची व्यवस्था करण्यात आली असून सदर उपहारगृह हे ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येते. या कारागृहात बंदिस्त असलेले न्यायाधीन बंदी तसेच सिध्ददोष बंदी यांना त्यांचे नाते वाईकांशी मुलाखतीसाठी मुलाखत कक्ष बांधण्यात आलेला आहे. [४१]



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**समारोप -**

कळंबा मध्यवर्ती कारागृहाचा इतिहास पाहताना, कारागृहाची व्याख्या, प्रचलित शब्द, कारागृह योजने मागील दृष्टीकोन, कारागृहाचा ग्रंथिक उल्लेख कारागृह यंत्रणा उत्पत्ती, कोल्हापूर शहरातील गुन्हेगार जाति, शिक्षेचे स्वरूप, कारागृहाचे वर्गीकरण पाहणे आवश्यक आहे त्याच बरोबर कळंबा कारागृह निर्माण होण्याच्या अगोदर कोल्हापूर राज्यात तुरूंग व्यवस्था कशी होते हे पाहणे आवश्यक आहे. कोल्हापूर राज्यात सुरूवातीला गुन्हेगारांना किल्ल्यात, अंधारकोठडी, तळघरे यामध्ये कोंडून ठेवीत कधी गुन्हेगाराला चावडीत बांधून ठेवले जाई. पुढील काळात १८४८ ला कोल्हापूर मध्ये थोरला तुरूंग बांधला गेला व गुन्हेगारांना तुरुंगात ठेवण्यात येऊ लागले. पुढे या तुरुंगाची इमारत कैद्याना अपूरी पडू लागली म्हणून १९४८ साली कळंबा येथे कारागृह बांधण्यात आले. सन १९९० मध्ये या कारागृहाला मध्यवर्तीचा दर्जा मिळाला. याची सविस्तर माहिती या प्रकरणात घेतली आहे. याचाच अर्थ गुन्हेगार जाति, शिक्षेचे स्वरूप, अपराध्यांना बंदिस्त करण्याचे ठिकाण यामध्ये बदल होत जाऊन गुन्हेगारांसाठी त्यांच्या गुन्ह्याच्या स्वरूपानुसार वेगवेगळ्या तुरुंगात ठेवण्याची व्यवस्था केलेली दिसून येते. कळंबा मध्यवर्ती कारागृहाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा उपयोग कोल्हापूर राज्यातील कारागृह संस्थेचा इतिहास समजण्यास होतो.

## संदर्भ सुची


१. प्रा. शिंदे खंडू अर्जुन, कोल्हापूर राज्यातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती (१८५१ ते १९००) अप्रकाशित एम.फिल प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर डिसेंबर १९९४, पृ.१

२. चौधरी कि. का, कोल्हापूर जिल्हा गॅझेटीयर, दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९, पृ.२

३. कित्ता - पृ.१८

४. कित्ता - पृ.३

५. कित्ता - पृ.२

६. श्री हिंगमिरे शिवप्रताप वसंत, पन्हाळ्याचा इतिहास, अप्रकाशित एम.फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर २००७, पृ. ३ ते ४

७. तर्कतीर्थ श्री जोशी लक्ष्मण, मराठी विश्वकोश, खंड तीन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ७१४

८. ठकार वि. शं., पर्याय शब्दकोश, नितिन प्रकाशन, पूणे जानेवारी २००८, पृ. ३६९

९. डॉ. ढोले बी. एन., कारागृह अधिक्षक, जळगाव, कारागृह समुपदेशन, पृ. १३

१०. तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मण, उपरोक्त, पृ. ७१४

११. तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मण, मराठी विश्वकोश, खंड पाच, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतिमंडळ, मुंबई, पृ. १११

१२. तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मण, उपरोक्त खंड तीन, पृ.७१४

१३. नागरीकांची सनद, गृह (तुरुंग विभाग) महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई, पृ. १

१४. Parashuram Las\kshman Vaidya, Harivamsa, Vol-I Bhandarkar oriental Research Institute, Poona, १९६९, Page ३३१

१५. डॉ. कुलकर्णी र. पु., कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतिमंडळ, मुंबई २००४, पृ. ७ व ८

१६. चौधरी कि.का., उपरोक्त, पृ. ५५८

17. Maharashtra Prison manual, Prescribed by the government of Maharashra 1979, Page V

१८. चौधरी कि. का., उपरोक्त, पृ. ५५८

१९. Maharashtra Prison Manual, उपरोक्त, पृ.vii

२०. चौधरी कि. का., उपरोक्त, पृ. ५५८

२१. डॉ. शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर २००८, पृ. २११

२२. प्रा. भोसले नंदकुमार रामू, कोल्हापूर राज्याची सामाजिक व आर्थिक परिस्थिती (१८०१ ते १८६०) अप्रकाशित एम.फिल. प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर नोव्हेबंर १९९०, पृ. ८१

२३. प्रा. शिंदे खंडू अर्जुन, उपरोक्त, पृ. १०५

२४. कित्ता, पृ. १०४ ते १०५

२५. बगाडे दत्तात्रय राजाराम, राजर्षी शाहू महाराज आणि कायदेकानून, पृ. ६३

२६. श्री. जाखले प्रल्हाद बाबुराव, कोल्हापूर संस्थानातील न्यायव्यवस्थेचा विकास (इ.१७१० ते १९४९) अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ.५१

२७. शिंदे खंडेराव अर्जुन, उपरोक्त, पृ. २११

२८. www.mahaprison.gov.in

२९. Mahaarashtra Prison Manual, उपरोक्त, पृ. १ व २

३०. चौधरी कि. का., उपरोक्त, पृ. ५५७

३१. कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तीका, पृ.२

३२. चौधरी कि. का., उपरोक्त, पृ. ५५७ ते ५५८

३३. कित्ता पृ. ५५७

३४. बगाडे दत्तात्रय राजाराम, उपरोक्त, पृ. ६३

३५. मुंबई इलाख्याचे गॅझिटिअर, पृ. ४१५ ते ४१७

३६. करवीर सरकारचे नगदी वटहुकूम सन १८८४, १९३६, पृ. १८६

३७. चौधरी कि. का., उपरोक्त, पृ. ५५८

३८. कित्ता, पृ. ५५८

३९. Development plan for Kolhapur state, A.N. Michel Pant pradhan, Kolhapur State, 1946, 12 March, Page १३३ ते १३४

४०. चौधरी कि. का., उपरोक्त, पृ. ५५७ ते ५५८

४१. कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका, उपरोक्त, पृ. २ ते ३